## ८.९ केळी मृगबाग लागवड

८.९.१ मृगबाग लागवडीची केळी तारुण्य अवस्थेत अथवा केळफुल बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे. केळी बागेची ही अवस्था अत्यंत संवेदनशील आहे. सध्या अधूनमधून ढगाळ वातावरण व तापमानातही वाढ होत आहे. त्यामुळे बागेचे नियोजन व्यवस्थित करणे आवश्यक आहे.

८.९.२ केळी बागेतील पिवळी, रोगग्रस्त पाने धारदार विळ्याने कापून बागेबाहेर त्याची विल्हेवाट लावावी.

८.९.३ झाडाभोवतालची पिले नियमित कापून बाग स्वच्छ ठेवावी.

८.९.४ प्रौढ व बाल्यावस्थेतील फुलकिडे अपरिपक्व केळी फळाची साल खरवडून बाहेर येणारा अन्नरस शोषण करतात. अशा ठिकाणच्या पेशी मृत झाल्याने त्या फळावर तांबूस किंवा लालसर रंगाचे चट्टे पडतात. अशा घडावर केळफुल बाहेर पडतेवेळी ॲसिटामीप्रीड १.५ ते २ ग्रॅम अधिक उत्तम प्रतीचे सरफॅक्टंट (स्टिकर) १० मि.लि. प्रति २० लिटर पाण्यात मिसळून नॅपसॅक पंपाच्या सहाय्याने संपूर्ण घडावर फवारणी करावी.

८.९.५ बागेमध्ये ठिबक संच व्यवस्थित अंथरुन त्यांची सर्व झाडांना पाणी तसेच खतांचा पुरवठा व्यवस्थित होतो किंवा नाही याची तपासणी करावी. विद्राव्य खते शिफारशीप्रमाणे वेळच्या वेळी द्यावीत. मृगबागेच्या केळीस ०:५२:३४ व ०:०:५० ही विद्राव्य खते प्रत्येकी ५० किलो प्रति एकर याप्रमाणे १४७ ते २७२ दिवसांमध्ये टप्प्याटप्प्याने द्यावीत.

८.९.६ केळी बागेमध्ये ठिबकची व्यवस्था नसल्यास, लागवडीनंतर १६५ दिवसांनी युरिया ८२ ग्रॅम व म्युरेट ऑफ पोटॅश ८३ ग्रॅम प्रतिझाड या प्रमाणे झाडापासून १५ सें.मी. अंतरावर बांगडी पध्दतीने देऊन त्वरित मातीने झाकुन घ्यावे.

८.९.७ ढगाळ वातावरणामुळे बागेमध्ये बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. सध्याच्या काळात केळीवर येणारा करपा किंवा सिगाटोका या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. वाढीच्या अवस्थेतील बागेत करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढेल. जी बाग निसवणीच्या अवस्थेत आहे, त्या बागेत घड अडकण्याचे प्रमाण दिसून येईल.

८.९.८ आगामी काळामध्ये ढगाळ वातावरण तसेच आर्द्रतेमध्ये वाढ झाल्यास करपा रोगाचा प्रार्दुभाव वाढण्याची शक्यता असते. त्यासाठी केळी बागेवर प्रोपीकोनॅझोल (२५ईसी) १० मि.लि. किंवा कार्बेन्डझीम (५० डब्ल्यूपी) १० ग्रॅम अथवा मॅन्कोझेब (७५ डब्ल्यूपी) २५ ग्रॅम या सोबत उत्तम प्रतीचे सरफॅक्टंट (स्टिकर) १० मि.लि प्रति १० लिटर या प्रमाणे घडासहित संपूर्ण झाडावर नॅपसॅक पंपाने फवारणी करावी.

## ८.१० केळी कांदेबाग–

८.१०.१ कांदेबाग लागवडीची केळी सध्या वाढीच्या अवस्थेत आहे. केळी पिकास उभी व आडवी वखरपाळी देऊन केळीबाग तणविरहीत ठेवावी, तसेच झाडांना मातीची भर द्यावी.

८.१०.२ बागेमध्ये विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास रोगग्रस्त झाडे मुळासकट उपटून बागेबाहेरील खड्ड्यात टाकावीत, तसेच करपाग्रस्त व पिवळी पाने कापून नष्ट करावीत व बाग स्वच्छ ठेवावी.

८.१०.३ मुख्य खोडालगत येणारी पिले धारदार विळ्याने नियमित कापावीत व त्यांची बागेबाहेर योग्य विल्हेवाट लावावी.